# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 11.06.2025** **वार- बुधवार**

---

**तपासणी**

श्री संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या सर्व वाहनांची संबंधित वाहनचालकांनी १९ जूनपर्यंत तांत्रिक तपासणी करुन घेण्याचं आवाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयानं केलं आहे. पालखी सोहळ्यावेळी देहू, आळंदी ते पंढरपूर या दरम्यान पालखी मार्गावर प्रवासी तसंच जड वाहनं मोठ्या प्रमाणात सहभागी होतात. या वाहनांतील तांत्रिक दोषांमुळं अपघात होऊ नये, वाहनं रस्त्यात बंद पडून वाहतुकीला अडथळा होऊ नये यासाठी वाहनचालकांनी प्रादेशिक परिवहन कार्यालयाचं आळंदी रोड चाचणी मैदान आणि दिवे इथल्या टेस्ट ट्रॅकवर कार्यालयीन वेळेत वाहनांची तांत्रिक तपासणी करुन घ्यायची आहे.

**नंबरप्लेट**

राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत मोटार वाहनांवर HSRP म्हणजे उच्च सुरक्षितता नोंदणी क्रमांक पाटी बसवून घ्यावी असं आवाहन नागरिकांना करण्यात येत आहे. १६ जूनपासून अशी पाटी न बसवलेल्या वाहनांचं कामकाज करण्यात येणार नाही, असं पिंपरी चिंचवडचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी पत्रकाद्वारे कळवलं आहे.

**प्रभाग**

पुणे महापालिकेची  निवडणूक चार सदस्यीय प्रभाग रचनेनुसार होणार आहे.  २०११च्या जनगणनेच्या लोकसंख्येनुसार प्रभाग रचना करण्याचे आदेश राज्य सरकारच्या नगरविकास विभागाने दिले आहेत. त्यामुळं पुण्यात प्रभाग संख्या ४२ राहणार असून, नगरसेवकांची संख्या १६५ राहणार आहे. प्रारूप प्रभाग रचना तयार करण्यासाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली जाणार आहे.

**प्रशिक्षण**

भारतीय लष्कराच्या दक्षिण कमांडच्या मुख्यालयाअंतर्गत, पुण्यातील औंध मिलिटरी स्टेशन इथं परदेशी प्रशिक्षण आणि लष्करी – नागरी संयुक्त प्रशिक्षणाच्या अंतर्गत, उपजिल्हाधिकारी, पोलिस उपअधीक्षक, राज्य कर सहाय्यक आयुक्त आणि गट विकास अधिकारी यासारख्या वरिष्ठ नागरी अधिकाऱ्यांसह १६१ महाराष्ट्र राज्य सेवा अधिकाऱ्यांनी एक सघन लष्करी-केंद्रित प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला. नेतृत्व विकास, आंतर-सेवा समन्वय आणि संकट व्यवस्थापन कौशल्यं वाढवणं, कठीण परिस्थितीत निर्णय घेण्यास अधिकाऱ्यांना तयार करणं हा त्याचा उद्देश होता.

**बियाणे**

बनावट बियाण्यांचा धोका टाळण्यासाठी यंदाच्या खरीप हंगामापासून राज्य शासनानं ‘साथी’    पोर्टलवर बियाणं नोंदणी अनिवार्य केली आहे. यंदा ७० हजार क्विंटल बियाणं नोंदणीकृत केलं असून त्यांचा माग काढता येतो असं पुणे  कृषी  विभागाद्वारे सांगण्यात आलं आहे. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी बियाण्यांच्या गुणवत्तेची हमी देणारा ‘साथी’    पोर्टल हा एक उपक्रम आहे.

**रोपे**

राज्यातील खरीप हंगामाला सुरुवात झाली असून लागवडीसाठी एकंदर तीन कोटी 63 लाख 16 हजार कलमं आणि रोपं रोपवाटिकांमध्ये उपलब्ध आहेत. मान्सूनपूर्व पावसाचा जोर वाढल्यानं यंदा मे महिन्यातच शेतकऱ्यांकडून रोप आणि कलमं यांची मागणी वाढल्याची माहिती पुणे  कृषी विभागाचे

फलोत्पादन संचालक अशोक किरनहळी यांनी दिली. राज्यातील तेराशे छप्पन रोपवाटिकांपैकी 144 शासकीय आहेत.

**वाहन**

भारतातील सर्वात मोठ्या व्यापारी वाहन आणि रस्ते वाहतुक उद्योगावरील परिषदेचं पुण्यात आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी परिवहन मंत्री प्रताप सरनाईक प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शासनाने नुकत्याच प्रकाशित केलेल्या ई-वाहन धोरणाचा मुख्य उद्देश ई-वाहनांच्या उत्पादनाला चालना, तसंच वापरकर्त्यांना प्रोत्साहन देण्याचा असल्याचं त्यांनी सांगितलं. या परिषदेत देशातील आघाडीचे व्यावसायिक वाहन उत्पादक, पुरवठादार, वितरक आणि वाहतूक क्षेत्रातील मान्यवर एकत्र आले होते. यावेळी उद्योगातील प्रवाह, नवकल्पना आणि भविष्यातील दिशा यावर सखोल चर्चा झाली. वाहतुकीच्या क्षेत्रात प्रेरणादायी कामगिरी करणाऱ्यांचा गौरव करण्यात आला.

**गाड्या**

आषाढी एकादशीच्या निमित्ताने मध्य रेल्वेने १ जुलै ते ७ जुलै दरम्यान पंढरपूर साठी ८० आषाढी विशेष गाड्या सोडण्याचा निर्णय घेतला आहे.

**सत्कार**

फ्रेंड्स इलेव्हन फुटबॉल क्लबचे संस्थापक आणि फुटबॉल क्रीडा महर्षी वसंतराव देशपांडे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ विविध क्षेत्रात योगदान देणाऱ्यांना पुरस्कारानं पुण्यामध्ये गौरवण्यात आलं. यामध्ये ज्येष्ठ क्रीडा संघटक डॉक्टर मदन कोठुळे यांना जीवनगौरव पुरस्कार तर क्रीडा संघटक शैलेश आंदेकर, थाळीफेक खेळाडू सात्विक डेंगळे, राष्ट्रीय स्केटिंग खेळाडू अथर्व भांड,सामाजिक क्षेत्रासाठी निरंजन

दाभेकर आणि राजेश क्षीरसागर यांना पुरस्कार देण्यात आले. 14 वर्षाखालील गटातील फुटबॉल खेळाडू रुद्र मोरे याला शिष्यवृत्ती देण्यात आली.

**नोटीस**

एका राजकीय पक्षाचा पदाधिकारी पुणे महापालिकेच्या आरोग्य विभागातील महिला अधिकाऱ्याला त्रास देत असल्याच्या तक्रारीची दखल का घेतली नाही, याचा खुलासा करण्याबाबतची नोटीस आरोग्य प्रमुखांनी दोन अधिकाऱ्यांना बजावली आहे. या महिला अधिकाऱ्यानं यावर्षी जानेवारीमध्ये महापालिका आयुक्तांसह आरोग्य प्रमुख तसंच, महापालिकेच्या अंतर्गत महिला तक्रार निवारण समितीकडं देखील तक्रार केली होती. मात्र, त्याची दखल घेण्यात आली नव्हती.

**परिषद**

भारतीय सनदी लेखापाल संस्थेच्या पुणे आणि पिंपरी-चिंचवड शाखेद्वारे 'नवोन्मेष २०२५' या विभागीय परिषदेचं आयोजन 13 आणि 14 जूनला पुण्यात करण्यात आलं आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते परिषदेचं उद्घाटन होणार असल्याची माहिती संस्थेच्या पुणे शाखेचे अध्यक्ष सचिन मिणियार यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**हवामान**

पुणे जिल्ह्यासाठी हवामान विभागानं आज पिवळा बावटा फडकवला आहे. उद्या आकाश ढगाळ राहून पावसाच्या हलक्या सरी पडण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**